**ठळक बातम्या**

- राज्यातल्या महापालिका निवडणुकांसाठी उद्या होणाऱ्या मतदानाची तयारी पूर्ण
- जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही काँग्रेससोबत आघाडी कायम ठेवण्याचे प्रकाश आंबेडकर यांचे संकेत
- छोट्या पक्षांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत पक्ष चिन्ह आरक्षित करण्यासाठी उद्यापर्यंत अर्ज करावे लागणार
- नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वलस्थानी

**आणि**

- भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा न्यूझीलंडचा निर्णय

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार आहे. विविध ठिकाणी मतदान साहित्याचं वाटप आणि कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर पोहोचवण्याची तयारी सुरू आहे. या मतदानाच्या निमित्त महापालिका क्षेत्रातल्या सर्व कार्यालयांना सरकारनं सुटी जाहीर केली आहे. विविध ठिकाणी मतदान करणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून विविध सवलती दिल्या जाणार आहेत. उद्याच्या मतदानाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(राज्यातल्या २९ महापालिकांसाठी उद्या सकाळी साडेसात ते साडेपाच दरम्यान मतदान होणार आहे. यासाठी निवडणूक आयोगानं दिलेलं मतदार ओळखपत्र मतदारांना दाखवता येईल. याशिवाय छायाचित्र असलेली इतर १२ ओळखपत्र दाखवली तरीसुद्धा मतदान करता येईल. या ओळखपत्रांमध्ये पारपत्र, आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, सरकारी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, निवृत्ती वेतनाची कागदपत्र, लोकप्रतिनिधींची ओळखपत्रं,*

*स्वातंत्र सैनिकांचं ओळखपत्र, बँक आणि टपाल खात्याचे पासबुक, दिव्यांग दाखला, मनरेगाचं जॉब कार्ड, किंवा आरोग्य विमा योजनेचं कार्ड यांचा समावेश आहे.*

*मुंबई वगळता राज्यातल्या इतर सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना आहे. बहुतांश प्रभाग हे ४ सदस्यीय असून काही प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय आहे. त्याठिकाणी मतदानांना जितक्या सदस्यांचा प्रभाग तितकी मतं द्यावी लागणार आहे. त्यांच्या ईव्हीएमवर ४ वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. या प्रत्येक मतपत्रिकेवर त्या त्या क्रमांकाच्या सदस्यपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची यादी आणि नोटाचे बटन असेल. मतदारांना ईव्हीएममध्ये या सर्व मतपत्रिकांच्या समोर असलेलं बटन दाबावं लागेल. मत नोंदवल्यावर ज्या उमेदवाराला मत दिलं त्याच्या समोरचा लाइट लागेल. सर्व उमेदवारांना मत दिल्यावर शेवटी बीप असा आवाज येईल आणि मतदान पूर्ण झालं याची खात्री मतदारांना मिळेल.)*

**<><><><><>**

महानगरपालिका निवडणुकांमध्ये सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा असं आवाहन ज्येष्ठ गायक आणि संगीत दिग्दर्शक शंकर महादेवन यांनी मतदारांना केलं आहे…

**होल्ड… बाईट- शंकर महादेवन**

**<><><><><>**

महापालिकेची निवडणूक प्रक्रिया आणि मतदानाचं महत्त्व पटवून देण्यासाठी धुळे महानगरपालिका आणि स्वीप कार्यक्रमांतर्गत घरघर संपर्क अभियान सुरू करण्यात आलं आहे. या अभियानांतर्गत पालिका शाळेतल्या विद्यार्थ्यांनी आई-बाबांना पत्र लिहून मतदानाचं आवाहन केलं.

**<><><><><>**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती कायम राहण्याचे संकेत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी दिले आहेत. या युतीमुळे ग्रामीण भागातल्या राजकारणात मोठा बदल होईल, असा विश्वास त्यांनी काल लातूर इथं बोलताना व्यक्त केला.

**<><><><><>**

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या आणि विशिष्ट अटींची पूर्तता करणाऱ्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तात्पुरत्या स्वरुपात निवडणूक चिन्ह आरक्षित करून हवं असेल, तर त्यांनी उद्यापर्यंत अर्ज करणं आवश्यक आहे, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

खरं तर यासाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच आणि उमेदवारी अर्ज भरायला सुरूवात होण्याच्या ३ दिवस आधी अर्ज करणं अनिवार्य असतं आणि १ दिवस आधी जिल्हाधिकारी त्यावर निर्णय घेतात. पण काल जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दोन दिवसांतच, म्हणजे १६ जानेवारीपासून नामनिर्देनपत्र दाखल करायला सुरुवात होणार आहे. त्यामुळे एखाद्या जिल्हा परिषदेच्या गेल्या निवडणुकीत एखाद्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षानं संबंधित अटींची पूर्ता केली असेल तर त्यांना उद्यापर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल. त्यावर संबंधित जिल्हाधिकारी १६ जानेवारीला निर्णय घेतील.

**<><><><>**

निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल असल्याचं नीती आयोगाच्या अहवालात म्हटलं आहे. निर्यात करण्याबाबतची राज्याची क्षमता आणि तयारी दर्शवणारा चौथा निर्यात सज्जता अहवाल निती आयोगाने आज प्रसिद्ध केला. राज्याचं निर्यात धोरण, व्यवसाय सुलभता, पायाभूत सुविधांची उपलब्धता तसंच प्रत्यक्ष निर्यात अशा अनेक बाबींवरुन हा निर्देशांक ठरवला जातो. केंद्र तसंच राज्य सरकारांकडून मिळालेल्या २०२४ सालच्या माहितीच्या आधारे हा अहवाल तयार केला आहे. या अहवालानुसार महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि पंजाब या राज्याचा क्रमांक लागतो तर लहान आकाराच्या राज्यांमध्ये उत्तराखंड निर्यातसज्जतेत पहिल्या क्रमांकावर आहे.

**<><><><>**

देशभरात आज मकर संक्रांत, उत्तरायण, लोहडी, माघ बिहू आणि पोंगल हे सण साजरे होत आहेत. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचं प्रतीक आहेत आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती

सी. पी. राधाकृष्णन यांनीही या सणांच्या निमित्ताने सर्वांना आनंद, आरोग्य आणि समृद्धीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. संक्रातींचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, आरोग्य घेऊन येवो, अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व्यक्त केली आहे. तर माघ बिहूच्या निमित्ताने देशात धान्यसमृद्धी आणि एकतेचा आनंद साजरा होवो, अशा शुभेच्छा त्यांनी समाजमाध्यमावर दिल्या आहेत. चैतन्यशील तमिळ संस्कृती आणि निसर्गाशी संबंधित असलेला पोंगल हा उत्सव संतुलनाचा मार्गदर्शक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्या निवासस्थानी झालेल्या मेळाव्याला ते संबोधित करत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही सर्वांना देशभरातल्या विविध सणांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

संत निवृत्तीनाथ महाराज यात्रेनिमित्त नाशिकमधल्या त्र्यंबकेश्वर इथल्या संत निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिरात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज पहाटे सपत्नीक शासकीय महापूजा केली. राज्यातल्या शेतकरी, कामगार आणि नागरिकांच्या जीवनात सुख, समृध्दी येऊ दे, अशी प्रार्थना केल्याचं त्यांनी सांगितलं.

पौष वारीसाठी राज्यभराच्या कानाकोपऱ्यातून दोन लाखाहुन अधिक वारकरी आणि सुमारे ६०० दिंड्या त्र्यंबकेश्वरमध्ये आल्या आहेत. भाविकांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने सुमारे दोनशे ज्यादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

<><><><>

नंदूरबारमध्ये आयकर विभागाने एका मद्य विक्रेत्या आस्थापनेवर छापा टाकून ५५ लाखाचा कर वसूल केला. आस्थापनेच्या चालू आर्थिक वर्षात ५५ कोटी रुपयांची मद्य विक्री झाली असतांना त्यावरील १ टक्का कर आस्थापनेने शासकीय तिजोरीत जमा केलेला नसल्याने नाशिक आणि जळगांवच्या, आयकर आणि टीडीएसच्या संयुक्त पथकानी ही कारवाई केली.

<><><><>

भंडारा पोलिसांनी लाखनीतून ४४ हजार रुपये किंमतीची सुगंधित तंबाखू जप्त केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ जानेवारी २०२६ - बुधवार

**<><><><><>**

मुंबईत दहशतवादविरोधी पथकाने एका बांग्लादेशी महिलेला अटक केली आहे. कफ परेड भागात राहणाऱ्या या महिलेजवळ  प्रवास किंवा वास्तव्यासाठीचे कोणतेही वैध कागदपत्र  नव्हते. तसंच याआधीही या महिलेला याआधी बांग्लादेशात परत पाठवण्यात आलं होतं पण तिने बेकायदेशीर मार्गाने पुन्हा भारतात प्रवेश मिळवल्याचं प्राथमिक चौकशीत आढळून आलं.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेतला दुसरा सामना राजकोटमध्ये सुरू आहे. यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. जखमी वॉशिंग्टन सुंदरच्या जागी भारतानं नितीश कुमार रेड्डीला संघात स्थान दिलं आहे.

सलामीवीर रोहित शर्मा २४ धावा काढून तर कर्णधार शुभमन गिल ५६ धावांवर बाद झाला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारतानं २२ षटकांत ३ गडी गमावून ११७ धावा केल्या होत्या.

मालिकेतला पहिला सामना जिंकून भारत १-०नं आघाडीवर आहे. आजचा सामना जिंकून ही मालिका जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

**<><><><><>**

इंडियन ओपन सुपर सेव्हन हंड्रेड बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारताचा किदंबी श्रीकांत यानं भारताचाच तरुण मन्नेपल्ली याच्यावर विजय मिळवून पुढच्या फेरीत प्रवेश केला. अटीतटीचा हा सामना त्यानं १५-२१, २१-६, २१-१९ असा जिंकला. मिश्र दुहेरीत मात्र रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे यांच्या जोडीला जर्मनीच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

**//<><><><><>//**